माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४९/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. महेंद्र चोरारीया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ प्र) शहर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर-२ यांचे कार्यालय,
महापालिका नवीन बिल्डिंग, भगवान वाल्मिकी चौक, हुनमान मंदिरासमोर,
विद्यांलकार मार्ग, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व) मुंबई -३७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर२**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर-२ यांचे कार्यालय,
महापालिका नवीन बिल्डिंग, भगवान वाल्मिकी चौक, हुनमान मंदिरासमोर
विद्यांलकार मार्ग, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व) मुंबई -३७

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ४८५७/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १७३८/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०८.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून हस्तांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इप्र) शहर बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०३.०२.२०२० व दि.०४.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांनी दि. २१.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती संलग्न करुन तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता त्यांचे अधिवक्ता यांनी त्यांचे लेखी दि. २३.०५.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दि. २१.०१.२०२० रोजीचे पत्र मिळाले. परंतु त्या पत्रात नमुद संलग्न अभिलेख नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अभिलेख उपलब्ध आहे व तक्रारकर्ता यांना पुन्हा उपलब्ध करुन देता येईल. तक्रारकर्ता यांनी सदर अभिलेख माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत साक्षांकित करुन उपलब्ध

..२/-

करुन देण्याची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना पाठविण्यात आलेली माहिती संलग्न अभिलेखसह पुन्हा तक्रारकर्ता यांना पाठवावा व सदर माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ३०.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २३.०५.२०२५**

State Information Commission Greater Mumbai
सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**